ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 33.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, ३ जून, १९६४ | अंक ११

## विविध माहिती

**साखरेच्या टंचाईचा परिणाम**—नागपूर येथील संत्रा बागाइतदार संघानें संत्रीं व इतर फळें हवाबंद डब्यांत भरण्याचें काम बंद केलें आहे. फळांचे टिकाऊ पदार्थ सहकारी तत्त्वावर तयार करण्याचा कारखाना संघ चालवीत असे. गेल्या कांहीं दिवसांत कारखान्याला पुरेशी साखर मिळूं शकली नाहीं. त्यामुळें ही आपत्ति ओढवली आहे. गेलीं दोन वर्षें कारखान्यानें २५ लाख रुपयांच्या मालाचें उत्पादन केलेलें आहे.

**रद्द केलेल्या चलनी नोटा**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें ५० व १०० कॅटसच्या चलनी नोटा रद्द केल्याचा हुकूम काढल्यानंतर रंगूनमधील अनेक परदेशीय वकिलातींनीं १० लाखांवर किंमतीच्या चलनी नोटा परत केल्या. आतांपर्यंत नागरिकांनीं ७ कोटी कॅटसच्या नोटा सरकारी आज्ञेप्रमाणें परत केल्या आहेत.

**लठ्ठ जोडप्यांना लठ्ठ मुलें**—ब्रिटनमधील सुप्रसिद्ध 'लान्सेट' ह्या वैद्यकीय नियतकालिकानें अशी माहिती प्रसिद्ध केली आहे कीं, लठ्ठ पतिपत्नींना लठ्ठ मुलें होण्याचा अधिक संभव असतो. दोहोंपैकीं एक लठ्ठ असेल तर असा संभव ५० टक्के असतो. दोघेहि लठ्ठ असतील तर मात्र हा संभव ८० टक्क्यांपर्यंत वाढतो.

**संयुक्त शेतवाडीचा शेवट**—श्रीरामपूर तालुक्यांत लोणी बुद्रुक ह्या गांवीं १९५२ सालीं संयुक्त शेतवाडी स्थापन करण्यांत आली होती. शेतवाडीच्या चालकांनीं २०० एकर जमिनींत सुधारणाही केली होती. परंतु गेल्या चार वर्षांत ह्या भागांत पाण्याचा अपुरा पुरवठा झाल्यानें उसाचें पीक घेतां आलें नाहीं. सुमारें ७० एकरांत ऊस लावण्यांत येत असे. पाण्याच्या टंचाईमुळें शेतवाडीचा कारभार गुंडाळण्यांत आला आहे.

**इचलकरंजी येथे सहकारी गिरणी**—महाराष्ट्र सरकारनें इचलकरंजी येथे शेतकरी-विणकरी सुताची सहकारी गिरणी काढण्यासाठी २५ हजार चात्यांची परवानगी दिली आहे. ह्या गिरणीचें भांडवल ७० लाख असून त्यापैकीं निम्में भांडवल राज्यसरकार घालणार आहे. महाराष्ट्रांत सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारी ती सर्वांत मोठी गिरणी होईल.

**आंब्यांची निर्यात**—रत्नागिरी जिल्ह्यांतील आणि सुरत जिल्ह्यांतील उत्तम हापूसचे आंबे दरसाल ब्रिटनला निर्यात करण्यांत येत असतात. आतां ठाणें जिल्ह्यांतील कांहीं निवडक मालहि निर्यात करण्यांत येणार आहे. ठाणें जिल्ह्यांतील आंबे निर्यात करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. आंब्यांच्या फळांची निवड कसोशीनें करण्यांत येणार आहे.

**व्याज माफ होण्याचा संभव**—टाटा स्टील आणि इंडियन आयर्न ह्या कंपन्यांना भारत सरकारनें प्रत्येकीं १० कोटी रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. मुळांत हीं कर्जें बिनव्याजीं देण्यांत आलीं होतीं. परंतु १९५८ पासून त्यावर ५·५ टक्के व्याज आकारण्यांत येऊं लागलें. त्यामुळें ह्या कंपन्यांवर ३·५ कोटी रुपयांचा बोजा पडत आहे. ही व्याजाची आकारणी रद्द करण्यांत येण्याचा संभव आहे.

**सुडानला भारताचें साह्य**—सुडानच्या सरकारला भारतानें ५ कोटी रुपयांचें कर्ज देऊं केलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून सुडान भारताकडून इंजिनिअरिंगचा माल, यंत्रसामग्री, रासायनिक पदार्थ, औषधें आणि इतर कांहीं माल घेणार आहे. सुडानमध्यें नवीन उद्योगधंदे काढण्यासाठी जरूर असलेलें तांत्रिक ज्ञानहि पुरविण्याची तयारी दाखविण्यांत आली आहे. उभयता देशांत आर्थिक सहकार्य घडवून आणण्याच्या कामांतील ही पहिली पायरी आहे.

**जपानला मिठाची निर्यात**—१९६४ च्या जुलैपासून १९६६ च्या जून अखेरपर्यंत भारत जपानला ६ लाख टन रासायनिक क्षार निर्यात करणार आहे. ह्या संबंधींच्या करारावर स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि जपान ह्यांच्यातर्फें नुकत्याच सह्या करण्यांत आल्या. जपानखेरीज फिलिपाइन्स आणि मॅलेशिया ह्यांनींहि भारताकडून रासायनिक क्षार आयात करण्याबद्दल आस्था दाखविली आहे.

**सत्त्वयुक्त आहारासाठी मदत**—लोकांच्या आहारांत प्रोथिनयुक्त पदार्थांचा समावेश अधिक प्रमाणांत व्हावा म्हणून उत्तरप्रदेशांत कोंबडीं पाळण्याच्या धंद्याला उत्तेजन देण्यांत येणार आहे. ह्यासाठी आखलेल्या योजनेला ऑस्ट्रेलियांतील एका संघटनेकडून मदत मिळणार आहे. जगांतील उपासमार थांबविण्याचा प्रयत्न करणारी अशी ही संघटना आहे.

**पोस्टांतील कामाचें यांत्रिकीकरण**—हिंदमधील मोठ्या शहरांतील पोस्टाच्या कचेऱ्यांतून पत्रव्यवहार हाताळण्यासाठी सरकत्या पट्ट्यांची यांत्रिक सोय करण्यांत येणार आहे. प्रथम ही व्यवस्था दिल्ली येथील विमान टपाल कचेरींत चालू करण्यांत येईल.

**झांजीबारच्या सुलतानाची सोय**—झांजीबारच्या सुलतानाला १ लाख पौंडांचा तनखा देण्याचें ब्रिटिश सरकारनें जाहीर केलें आहे. झांजीबारमध्यें क्रांति झाल्यावर सुलतान ब्रिटनमध्यें पळून आले. ही रक्कम विश्वस्तानिधि म्हणून मानण्यांत येईल आणि त्यावरील व्याज सुलतानाला तो ब्रिटनमध्यें राहात असेपर्यंत मिळत राहील.

### पुरुषांच्या पोषाखाची निवड स्त्रिया करतात

कोइमतूर येथील हातमागाच्या बाजारपेठेची पाहणी करण्यांत आली असतां कांहीं उद्बोधक आणि मनोरंजक माहिती उपलब्ध झाली आहे. ह्या पाहणींत असें दिसून आलें कीं अलीकडे पुरुषांनीं पोषाखासाठीं वापरावयाच्या कापडाची निवड बहुधा घरधनीण करते. ४६ टक्के पुरुषांनीं आपल्यासाठीं लागणाऱ्या कापडाची निवड आपली पत्नी करते असें स्वच्छ सांगून टाकलें. फक्त २८ टक्के स्त्रियांनीं आपले पतिराज स्वत:साठीं लागणाऱ्या कापडाची निवड स्वतःच करतात असें नमूद केलें. कापडाची खरेदी करण्याचा निर्णय आणि कोणते कापड घ्यावयाचे ह्यासंबंधीचा निर्णय करण्याचें काम उत्तरोत्तर स्त्रियांच्या हातीं जात आहे. त्यांतल्यात्यांत विवाह झालेल्या स्त्रिया ह्या बाबतींत विशेष अधिकार गाजवितांना दिसून येतात. पुरुषांमध्यें धोतरां-ऐवजी विजार घालण्याची प्रवृत्ति वाढत आहे. स्त्रियांमध्यें कमी लांबीची साडी वापरण्याकडे कल अधिक झुकूं लागलेला आहे. पुरुष आपल्या कपड्यावर दरसाल सरासरी ९५ रुपये खर्च करतात तर स्त्रिया सुमारें ११० रुपये खर्च करतात असें दिसून आलें. शिकलेला तरुण वर्ग आणि शहरांतील ग्राहक वर्ग हातमागाच्या कापडाची खरेदी अधिक प्रमाणांत करतांना दिसतो. हातमागाच्या कापडांत साड्यांच्या निर्मितीचें प्रमाण अधिक असल्यानें स्त्रिया हातमागाचें कापड साहजिकच अधिक घेतांना आढळतात. पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या पोषाखाच्या आवडी-निवडींत फार झपाट्यानें बदल घडून येत आहे. मोठ्या दुकानां-मधून अगर सहकारी संघटनांच्या दुकानांतून कापड खरेदी करण्याची वृत्ति जास्त दिसून येते. उलटपक्षीं, रस्त्यामधील फेरीवाल्याकडून १० टक्के कापडाची विक्री करण्यांत येते.

---

### राहत्या घरांच्या टंचाईचा बिकट प्रश्न

माणसाच्या तीन प्रमुख मूलभूत गरजा म्हणजे अन्न, वस्त्र आणि आसरा. निवाऱ्याच्या जागेला तर व्यक्तीच्या दृष्टीइतकेंच सामाजिक दृष्टीनेंहि महत्त्व आहे. भारतामधील प्रमुख शहरांतील राहत्या जागांच्या टंचाईनें नवीन सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत. राहत्या घरांची टंचाई दूर करण्यासाठीं दिल्लीजवळ एक कारखाना उभारण्यांत आला होता. ह्या कारखान्यांत घरांचे निरनिराळे सुटे भाग तयार करून ते त्वरित उभारण्याच्या कल्पनेचा अवलंब करण्यांत आला होता. परंतु कारखान्याला यावे तसें यश आलें नाहीं. त्यामुळें घरें बांधण्याचें काम जुन्याच पद्धतीनें चालू राहिलें आहे. ह्या पद्धतीनें उभारण्यांत येणाऱ्या राहत्या जागा तयार होण्यास अर्थातच वेळ लागतो. परिणामी, बिऱ्हाडांच्या जागांची टंचाई लवकर दूर करणें कठीण होऊन बसते. ह्या बाबतींत युरोप आणि अमेरिकेंत चांगली प्रगति करण्यांत आलेली आहे. घरांच्या भिंती, दरवाजे, छपरें इत्यादि अनेक भाग कारखान्यांत तयार करून झटपट घरें बांधण्याचें तंत्र तिकडे चांगलें प्रगत झालें आहे. ह्यासंबंधीं मद्रास राज्य सरकारांतील उद्योगमंत्री श्री. वेंकटरामन ह्यांनीं मॉस्को येथील घरांच्या कारखान्यासंबंधीं दिलेली माहिती बरीच उद्बोधक आहे. ह्या कारखान्यांत तयार झालेल्या सुट्या भागांचा उपयोग करून एक ६ मजली इमारत बांधण्यांत आली. इमारतींत १२० बिऱ्हाडांच्या जागा बांधण्यांत आल्या. प्रत्येक बिऱ्हाड दोन-तीन खोल्यांचें होतें. इतकें मोठें बांधकाम पुरें होण्यास अवघे १८ दिवस लागले. हीं घरें नेहमींच्या पद्धतीनें बांधण्यांत आलेल्या घरांच्याइतकींच टिकाऊ आणि मजबूत असतात.


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ – पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १½ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |
| **कायम ठेव–** | | | |
| १ महिना | ... | ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

# दि सांगली बँक लि.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० चे वर |
| रिझर्व्ह फंडस् | रु. १०,००,००० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ४ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत मिळून एकूण २३ शाखा

★ आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारचे बँकिंगचे अद्ययावत् व्यवहार योग्य तऱ्हेनें केले जातात.

★ हेड ऑफिस सांगली व इचलकरंजी, रविवार पेठ–पुणें आणि बेळगांव या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्सची सोय करण्यांत आली आहे.

**अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखाधिकाऱ्यास अवश्य भेटा.**

रजिस्टर्ड ऑफिस
राजवाडा चौक
सांगली.

एम. के. गुते
M. A., LL. B., C. A. I. I. B.
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ३ जून, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पं. जवाहरलाल नेहरू ह्यांचें निधन



पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं भारताला आजचें स्थान प्राप्त करून देण्यासाठी आपलें सर्व आयुष्य वेचलें; स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनीं दीर्घ काळ खडतर कारावास सोसला; स्वातंत्र्यानंतरच्या काळांत भारताला आधुनिक, समृद्ध, सामर्थ्यशाली बनविण्यासाठी मार्गदर्शन करून प्रत्यक्ष कृतीला चालना दिली. आर्थिक नियोजनाचे तेच प्रवर्तक होते. शास्त्रीय आणि औद्योगिक प्रगतीला आवश्यक असा दृष्टिकोन त्यांनीं निर्माण केला. देशाच्या भावनात्मक ऐक्याला व्यावहारिक, आर्थिक ऐक्याचा पाया घालून दिला. अणुशक्तीच्या निर्मितीची योजना, संशोधन-शाळांची स्थापना, वीज उत्पादनाचे प्रकल्प, धरणें, इत्यादींच्या मुळाशीं त्यांचीच दूरदृष्टि होती. ह्या सर्व योजनांस आवश्यक तें स्वास्थ्य मिळवून देण्यासाठी त्यांनीं कसून प्रयत्न केला; अलिप्ततेचें धोरण कायम राखून त्यांनीं अमेरिका, रशिया, अशा एकमेकांविरुद्ध गटांतील देशांतून भारता-साठी भरपूर आर्थिक मदत मिळविली. चिनी आक्रमणाच्या वेळीं पाश्चात्य राष्ट्रें भारताच्या मदतीला धावून आलीं आणि चीन एकाकी पडला, ही सर्व नेहरूंच्याच प्रभावाची किमया. ते नेहमीं 'भारताला असें वाटतें', 'भारताचा दृष्टिकोन असा आहे.' असें म्हणत असत; वास्तविक त्यांचें मत हेंच भारताचें मत होत असे. त्यांच्याइतका मनानें थोर आणि कर्तृत्वानें श्रेष्ठ पुरुष शतकाशतकांतहि निर्माण होत नसतो. त्यांच्या छत्राखाली वाढलेल्या नव्या पिढीनें भारताची आगेकूच कायम ठेवून त्यांचें स्वप्न साकार केले पाहिजे.

आदल्या रात्रीं निजण्यापूर्वीं त्यांनीं त्या वेळेपर्यंतचें सर्व काम पुरें केलें होतें; सकाळीं उठल्यावर छातींत दुखूं लागले तरी त्यांनीं त्याला न जुमानता आपलें नव्या दिवसाचें काम सुरू केलें होतें. इतका कर्तव्यदक्ष मनुष्य शोधूनहि सांपडणार नाहीं. त्यांनीं एका हयातीं-तच, चार हयातींतहि कित्येक थोर पुरुषांना करता येणार नाहीं, एवढें प्रचंड कार्य केलें आहे. त्यांच्या जीवनाचा प्रत्येकच पैलू श्रेष्ठ दर्जाचा होता. त्यांच्यापासून सर्वजण सतत प्रेरणा घेत राहोत! "आराम हराम है" हें त्यांचें एक वचनसुद्धां प्रत्यक्षांत आणलें, तरी भारताचा काया-पालट होऊन, आगामी पिढ्यांबाबत आपलें कर्तव्य केल्यासारखें होईल.

## आस्वान येथील प्रचंड धरणाचें काम

इजिप्तमध्यें रशिआच्या मदतीनें बांधण्यांत येत असलेलें आस्वान येथील धरण भारतांत बांधण्यांत येत असलेल्या मोठ्या धरणांपेक्षाहि प्रचंड आहे. ह्या धरणाच्या बांधणीसाठी १० कोटी पौंड खर्च येणार आहे. धरण बांधण्यासाठी नदीच्या सध्याच्या पात्रांतील पाणी तूर्त दुसरीकडे वळवून नेण्याची जरूर होती. तें काम नुकतेच पूर्ण झालें आहे. भारतामधील भाक्रा धरणांत ७४ लाख एकर फूट पाणी, नागार्जुनसागर धरणांत ९३ लाख एकर फूट पाणी आणि रिहंद येथील धरणांत ८६ लाख एकर फूट पाणी साठविण्यांत येणार आहे. आस्वान येथील धरणांत १२·७ कोटी एकर फूट पाणी सांठविण्यांत येणार आहे. धरणाचें बांधकाम १९६८ सालीं पूर्ण होईल. इजिप्तमधील जनतेच्या आर्थिक भरभराटीला या धरणाचा फार उपयोग होणार आहे. इजिप्तचा विस्तार ३ लाख, ८६ हजार चौरस मैलांवर पसरलेला आहे. परंतु ह्यापैकी ९७ टक्के जमीन ओसाड निर्मनुष्य वाळवंट आहे. इजिप्तची लोकसंख्या २·५ कोटी असून ती नाईल नदीच्या खोऱ्यांत अतिशय दाटीवाटीनें वसती करून आहे. ह्या खोऱ्यांत लागवडीखालीं आणण्यासारखी जमीन अवघी ६० लाख एकर आहे. धरणाच्या पाण्यामुळें आणखी २० लाख एकर जमीन भिजूं शकेल. त्याशिवाय २४ लाख किलोवॅट वीजहि धरणाच्या साह्यानें निर्माण करण्यांत येणार आहे. धरणासाठी ५०० कोटी रुपये खर्च येणार असला तरी त्याच्या पाण्याचा पूर्णपणें उपयोग करण्यांत आल्यास तो दोन वर्षांत भरून येईल. १९७४ च्या सुमारास हे शक्य होईल. पण, दरम्यान इजिप्तची लोकसंख्या सध्याच्या वेगानें वाढत गेल्यास त्याचा फायदा न झाल्यासारखाच होईल. कारण त्या सुमारास लोकसंख्या ३·५ कोटीच्या घरांत गेलेली असेल.

## मुंबईच्या पाणीपुरवठ्याचा बिकट प्रश्न

मुंबई शहराच्या वाढत्या विस्तारामुळें आणि लोकसंख्या फुगत चालल्यामुळें तेथील पाणीपुरवठ्याचा प्रश्न बिकट झालेला आहे. शहराच्या दूरच्या उपनगरांत तर पिण्याचें पाणी मिळण्याचीहि मारामार झालेली आहे. गेल्या कांहीं वर्षांत मुंबईच्या उपनगरांत कारखान्यांची वाढ एकसारखी होत आलेली आहे. परिणामीं पाण्याची मागणीहि सतत वाढत चाललेली आहे. सध्यां शहराला पाण्याचा पुरवठा करणारे ४ तलाव आहेत.– तान्सा, वैतरणा, विहार आणि तुळसी. ह्या तलावांमधून शहराला दररोज २३·३ कोटी गॅलन पाण्याचा पुरवठा करण्यांत येतो. परंतु त्यापैकी पुष्कळसे पाणी वायां जातें. बृहन् मुंबईतील कारखान्यांची पाण्याची मागणी ५ कोटी गॅलनसची आहे. त्याशिवाय शहरांतील व्यवहारासाठी ३० कोटी गॅलन्स पाणी लागतें. म्हणजे, गरजेच्या मानानें जवळजवळ १२ कोटी गॅलन्सचा तुटवडा भासत आहे. मुंबईत उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण प्रमाणाबाहेर झाले असल्याचें प्रसिद्धच आहे. ह्या संबंधींचे आकडे असे आहेत. महाराष्ट्र राज्यांत एकूण ११,५३९ नोंदणी केलेले कारखाने आहेत. त्यापैकी ३,५३९ म्हणजे जवळजवळ एक तृतीअंश कारखाने मुंबई शहरांत एकवटलेले आहेत. कारखान्यांना लागणाऱ्या पाण्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें त्यांच्या उत्पादकतेवर साहजिकच परिणाम होत आहे. मुंबई शहराचा विस्तार १६९ चौरस मैलांवर पसरलेला आहे. १९४१ मध्यें मुंबईची लोकसंख्या १४ लाखांच्या आसपास होती, ती १९५१ च्या सुमारास २८ लाखांपर्यंत आली. १९६१ मध्यें लोकसंख्येनें ४४ लाखांची पातळी गांठली. १९७१ च्या सुमारास मुंबईची लोकसंख्या ६० लाखांच्या घरांत जाईल आणि १९८१ च्या सुमारास ती ७५ लाखांची मर्यादा गाठेल असा अंदाज आहे.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

**बचतीच्या आकर्षक योजना**


| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३॥ ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ५ ,, |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर



महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )



**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

## बँकांना शनिवारीं सुट्टी—इंग्लंडमधील हालचाल

शनिवारीं बँका बंद ठेवण्याची शक्यता अजमावण्याचा आणि त्यासंबंधीं सत्वर निर्णय घेण्याचा आपला विचार लंडन क्लिअरिंग बँकर्सच्या कमिटीनें जाहीर केला, त्यावर वृत्तपत्रांतून साहजिकच विरोधी मतप्रदर्शन व्यक्त झालें. बँकिंगच्या सवयीचा प्रसार करण्यासाठी सुटीच्या दिवशींहि बँका उघड्या ठेवाव्यात, संध्याकाळींहि कांहीं शाखा चालू रहाव्यात, अशी मागणी असतांना शनिवारीं सर्व बँका अजिबात बंद ठेवण्याची कल्पना धक्का देणारी आहे. कांहीं शाखा शनिवारीं बंद ठेवण्याचा प्रयोग करून पाहण्याची पहिली कल्पना होती. ती रद्द करून बँकांनीं शनिवारीं सुटी घेण्याचा जवळ जवळ निर्णयच घेतलेला दिसतो. शनिवारच्या सुटीमुळें इतर दिवशींच्या कामाच्या तासांत थोडा बदल करावा लागेल आणि त्यासाठीं नोकरवर्गाच्या प्रतिनिधींशीं चर्चा करावी लागेल. साहजिकच हें सर्व गुप्त राहाणार नाहीं. तेव्हां, आपणच अगोदर शनिवारीं सुटी घेण्याचा निर्णय जाहीर करून टाकलेला बरा, असा बँकांचा युक्तिवाद दिसतो.

बँकांनीं आपले कामाचे तास शनिवार धरून वाढवावे; त्यासाठीं कामाच्या पाळ्या केल्या म्हणजे बँका आठवड्यांतून सहा दिवस चालू राहून नोकरांना पांचच दिवस काम पडेल अशी व्यवस्था करतां येईल, असें प्रतिपादन केलें जात होतें. परंतु त्यामुळें खर्च खूप वाढेल आणि नफ्याच्या दृष्टीनें विचार केला तर चार्जेस वाढविण्यापेक्षां सेवेंत कपात करणेंच बँकांना श्रेयस्कर वाटलें. बँकेंतील नोकरांची बाजू अशी कीं त्यांच्या स्नेह्यांपैकीं बहुसंख्य लोकांना शनिवारीं सुटी असते. बँकिंग हा व्यवसाय आहे, धंदा नव्हे, अशी त्यांना दिलेली शिकवण आहे. इतर कित्येक देशांतील बँक नोकरांना शनिवारीं सुटी असते, हें त्यांना माहीत आहे. त्यामुळें शनिवारीं बँका बंद ठेवण्याच्या घोषणेला बँक नोकरांचा पाठिंबा आहे; त्या घोषणेचें त्यांनीं स्वागतच केलें आहे. प्रत्येक देशांतील परिस्थिति वेगळी असते आणि वेगवेगळे पर्यायहि तेथें असतात, हें अर्थातच विसरून चालणार नाहीं. शनिवारची सुट्टी अधिकाधिक ठिकाणीं रूढ होऊं लागली आहे, हेंहि खरें आहे. इतर कचेऱ्यांना शनिवारीं सुट्टी असतांना बँकांना ती नाहीं, त्यामुळें बँकांकडे नवे नोकर आकृष्ट होत नाहींत, असा अनुभव येत आहे.

शनिवारीं इतर दिवसांपेक्षा नेहमींच जास्त गर्दी बँकांतून होते; तेव्हां शुक्रवारीं संध्याकाळीं ५ ते ७ बँका उघड्या ठेवाव्या, असें ह्यापूर्वींच सुचविण्यांत येत होतें. पण त्यापेक्षा पांचहि दिवस कामाचा एक एक तास वाढविणें गिऱ्हाइकांना जास्त आवडेल. बँका एक तास आधीं उघडल्या तर कौंटरवरची गर्दी कमी होईल.

### अधिकाऱ्यांना व्यवस्थापकीय शिक्षण

मद्रास राज्यांत तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कांहीं सहकारी साखरेच्या कारखान्यांची स्थापना करण्यांत येणार आहे. त्याच राज्याच्या आगामी पंचवार्षिक कार्यक्रमांत कांहीं मोठे व कांहीं मध्यम प्रतीचे कारखानेहि उघडण्यांत यावयाचे आहेत. हे कारखाने सुरळीत चालविण्यासाठी व्यवस्थापकीय ज्ञान असणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या पुरेशी नाहीं. ही उणीव भरून काढण्यासाठी राज्य सरकारनें शिकवून तयार केलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची राखीव भरती करण्याचे ठरविलें आहे. ह्या योजनेची सुरुवात म्हणून आय. ए. एस. श्रेणीच्या ८ अधिकाऱ्यांना व्यवस्थापकीय ज्ञानाचें शिक्षण देण्यांत येणार आहे. प्रथम त्यांना सहकारी सुताची गिरणी चालविण्याचें काम देण्यांत येणार आहे. त्यांचा अभ्यासक्रम २ महिन्यांचा राहील.

### वेगवेगळ्या देशांतील बँका उघड्या असण्याची वेळ

| | सोम–शुक्र | शनि. |
|---|---|---|
| ऑस्ट्रेलिया | १० ते ३ (अ) | बंद |
| बोलेव्हिया | ९ ते १२, २ ते ४–३० | बंद |
| ब्रॅझिल | ९–३० ते ५ | बंद |
| ब्रुसेल्स | ९ ते १; २–३० ते ३-३० (ब) | बंद |
| कॅलिफोर्निया | १० ते ५ (क) | बंद |
| कॅनडा | १० ते ३ (ड) | बंद |
| सिलोन | १० ते २; | ९–३० ते ११–३० |
| चिली | ८-४५ ते ५-४५ | ८–४५ ते १२–३० |
| कोपेनहेगन | १० ते ३ | ९ ते १२ |
| फ्रँकफूर्ट | ८-३० ते १, २-३० ते ४ (इ) | बंद |
| ग्रीस | ८ ते १ | ८ ते १ |
| हंगेरी | ९ ते १ | ९ ते १ |
| भारत | १० ते २ | १० ते १२ |
| आयर्लंड | १० ते १२-३०, १-३० ते ३ | ९-३० ते १२-३० |
| इटली | ९ ते १२, ३ ते ४ | बंद |
| जपान | ९ ते ३ | ९ ते १२ |
| लेबेनॉन | ८-३० ते १२-३० | ८ ३० ते १२ |
| माद्रिद | ९ ते १ | ९ ते १२-३० |
| मलेशिया | १० ते ३ | ९ ३० ते ११-३० |
| मारोक्को | ८-१५ ते ११-३०, २-१५ ते ४-३० | बंद |
| नेदरलँडस | ९ ते ४ | बंद |
| न्यूयॉर्क | १० ते ३ (फ) | बहुतेक बँका बंद |
| न्यूझीलंड | १० ते ३ | बंद |
| नायजेरिया | ८ ते १ | ८ ते ११ |
| नॉर्वे | ९-३० ते ३ | ९ ते १ |
| पॅरिस | ९ ते १२, २ ते ४ | बंद |
| स्टॉकहोम | ९-३० ते ३ | ९-३० ते १ (ग) |
| स्वित्झरलंड | ८-३० ते १२; २ ते ४-३० (ह) | ८-३० ते १२ |
| ग्रेटब्रिटन | १० ते ३ | ९ ते ११-३० |
| व्हिएन्ना | ८ ते १, २-३० ते ३-३० (ज) | बंद |

(अ) शुक्रवारीं ५ पर्यंत.
(ब) शुक्रवारीं ४-३० पर्यंत.
(क) कांहीं बँका शुक्रवारीं ४-३० ते ६.
(ड) शुक्रवारीं आणखी ४-३० ते ६.
(इ) शुक्रवारीं ६ पर्यंत.
(फ) एक दिवस ७ पर्यंत.
(ग) एप्रिल ते सप्टें. बंद.
(ह) येत्या १ जुलैपर्यंत.
(ज) शुक्रवारीं ४-३० पर्यंत.

### हिंदमधील बेघर लोक

१९६१ सालीं करण्यांत आलेल्या शिरगणतींत गोळा करण्यांत आलेल्या माहितीप्रमाणें भारतामधील ५० लाख लोकांना राहाण्यासाठी बिऱ्हाडाची जागा नाहीं. ह्यांपैकीं ९० टक्के लोक मोठ्या शहरांत केंद्रित झालेले आहेत. बृहन्मुंबईतील बेघरांची संख्या ७६ हजार आहे. बेघर लोकांची सर्वांत अधिक संख्या म्हैसुर राज्यांत आहे. त्याच्या खालोखाल मद्रास राज्यांत आणि महाराष्ट्रांत बेघर लोक आहेत. देशांतील एकूण घरांची संख्या १०·७ कोटि आहे, आणि त्यांतून ८·३ कोटी कुटुंबें राहात आहेत. एका कुटुंबांत ५ माणसें अशी सरासरी धरण्यांत आलेली आहे.

### खत विकत घेण्यासाठी कर्जे

जे शेतकरी सहकारी संघटनांचे सभासद नाहींत त्यांना खतें घेण्यासाठी कर्जाऊ रक्कम देण्याचा निर्णय आंध्र प्रदेश सरकारनें घेतला आहे. मात्र हीं कर्जे प्राथमिक सहकारी संस्थांच्या मार्फत दिलीं जातील. प्राथमिक संस्थांना कर्जे देतां यावींत म्हणून ५ कोटी रुपये त्यांच्या हवालीं करण्यांत येणार आहेत. ह्या निर्णयाचा फायदा २ लाख शेतकऱ्यांना मिळेल असा अंदाज आहे. शेतकऱ्यांकडून २५० रुपयांपर्यंतच्या कर्जाला तारण म्हणून कांहीं घेण्यांत येणार नाहीं. कर्जाची मुदत थोडी असेल. खताचा काळा बाजार करतां येऊं नये म्हणून आणि शेतींत खताचा अधिकाधिक वापर करता यावा म्हणून हा उपक्रम करण्यांत आला आहे. सहकारी संघटनांच्या सभासदांसाठी ३·५ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे.

### भांडवल गुंतवणुकीला अनुकूल वातावरण

अमेरिकेच्या व्यापारखात्याचे दुय्यम चिटणीस मि. रूझवेल्ट ४० अमेरिकन उद्योगपतींबरोबर भारताच्या दौऱ्यावर आले आहेत. भारतांत आणखी अमेरिकन भांडवल गुंतविण्यास किती वाव आहे तें पाहण्यासाठी इंडिअन इन्व्हेस्टमेंट सेंटरच्या आमंत्रणावरून त्यांचा दौरा आयोजित करण्यांत आला आहे. वार्ताहरांशीं बोलतांना मि. रूझवेल्ट म्हणाले कीं अविकसित देशांत भांडवल गुंतविण्यास उत्तेजन देण्याचें अमेरिकन सरकारचें धोरण आहे. ह्या मागासलेल्या देशांतील लोकांचें राहाणीचें मान सुधारण्यास त्यामुळें मदत होईल. भारतांत भांडवल गुंतविण्यास सध्याचें वातावरण पूर्वीच्या मानानें बरेच अनुकूल आहे.

### गणेश सहकारी साखर कारखाना

गणेश सहकारी साखर कारखान्यानें आपलें १९६३-६४ च्या हंगामाचें गळित थांबविलें आहे. हंगामांत कारखान्यानें १॥ लाख टनांवर ऊस गाळून १ लाख ८६ हजारावर साखरेचीं पोतीं निर्माण केली. नेहमीच्या काळापेक्षा कारखाना लवकर बंद करण्यांत आला. कारण, उसाचा पुरवठा अपुरा पडला. कारखान्याच्या कांहीं सभासदांनींच गुळाला भाव असल्यामुळें स्वतःच्या उसाचा गूळ केला.

### सर्पसत्रांचा भातशेतीवर परिणाम

मद्रास राज्यांतील भात पिकविणाऱ्या एका जिल्ह्यांत शेतांतील उंदरांचा सुळसुळाट झाल्यानें त्यांना मारण्याची मोहीम सुरू करण्यांत आली. गेल्या वर्षी ७ लाख उंदरांचा नाश करण्यांत आला. तरीहि त्यांची संख्या वाढल्यानें ५ ते १५ टक्के भात शेतकऱ्याच्या हातीं लागत नाहीं. जीवो जीवस्य जीवनम् ह्या न्यायानें शेतांतील साप उंदरांचे भक्षण करतात. परंतु गेल्या कांहीं वर्षांत सापाच्या कातड्यापासून बनविण्यांत येणाऱ्या चैनीच्या वस्तूंची मागणी वाढल्यानें लोकांनीं सर्पसत्र सुरू केलेले आहे. त्याचा परिणाम म्हणून उंदरांच्या संख्येवरलि एक नियंत्रण कमी झालें. निसर्गांतील समतोलपणा ढळल्यामुळें अशा आपत्ती नेहमींच ओढवत असतात.

### वीरांगनेचा पुतळा

जबलपूर कॉर्पोरेशननें शहरांतील एका तरी प्रमुख ठिकाणीं राणी दुर्गावती ह्या वीरांगनेचा संगमरवरी पुतळा उभारण्याचें ठरविलें आहे. राणी दुर्गावती गोंड ह्या आदिवासी जमातीची १६ व्या शतकांतील राणी होती. सम्राट अकबर ह्याच्या बलाढ्य सेनेशी आपल्या राज्यासाठी तिनें प्रखर लढा दिला आणि ती धारातीर्थी पतन पावली, असा इतिहास आहे.

### वीज-निर्मिती केंद्रासाठी मदत

चालू वर्षी रशिआच्या मदतीनें भारतांत सहा विद्युत् उत्पादन-केंद्रें चालू करण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक उत्तरप्रदेशांत हरदुआगंज ह्या ठिकाणीं उभारण्यांत येणार आहे. उष्णतेच्या साह्यानें वीज निर्माण करणाऱ्या ह्या केंद्राचा विशेष म्हणजे त्यांतील यंत्रसामग्रीची रचना. हा भाग वारंवार बसणाऱ्या भूकंपाच्या हादऱ्याविषयीं प्रसिद्ध आहे. म्हणून केंद्रासाठी विशेष प्रकारची यंत्रसामग्री तयार करण्यांत येणार आहे. केंद्राचा पाया घालण्याची जमीनहि असावी तितकी घट्ट नाहीं. त्यामुळें पायाहि वेगळ्याच पद्धतीनें घालावा लागणार आहे. इमारतीची रचना रशिअन एंजिनिअर्सच करणार आहेत. केंद्राची उत्पादनक्षमता १ लाख किलोवॅट आहे.

### परदेशीय मदतीबाबत इशारा

नियोजन-समितीचे एक सभासद श्री. थॅकर ह्यांनीं बंगलोर येथें बोलतांना परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीवर विसंबून राहाण्याबद्दल इशारा दिला आहे. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ह्या संस्थेपुढें बोलतांना ते म्हणाले कीं, येत्या पांच वर्षांच्या अवधींत भारताच्या अर्थव्यवस्थेनें स्वयंसिद्ध होऊन दाखविलें पाहिजे. तसें न झाल्यास ज्या गोष्टी गृहीत धरून पंचवार्षिक योजना यशस्वी होतील असें मानण्यांत आलें आहे त्याच उखडून जातील आणि देशाला अतिशय बिकट आर्थिक संकटांना तोंड द्यावें लागेल. तसें न होऊं देण्याची जबाबदारी सार्वजनिक व खाजगी ह्या दोन्ही विभागांवर आहे.

### अमेरिकन भांडवलाचें सहकार्य

भारतांत आलेल्या अमेरिकन उद्योगपतींच्या प्रतिनिधींच्या दौऱ्यांतून कांहीं प्रत्यक्ष फलनिष्पत्ति होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. कांहीं अमेरिकन उद्योगपतींनीं हिंदी भांडवलदारांशी सहकार्य करण्याचीं बोलणीं सुरू केलेलीं आहेत. ह्या सहकार्यांतून एक मोठा खताचा कारखाना आणि दोन रासायनिक कारखाने स्थापन होण्याची शक्यता आहे. ह्या दोन औद्योगिक क्षेत्रांत भारत सरकारनें परदेशी भांडवलाची मदत घेण्याची तयारी दाखविली आहे.

### लोकसंख्याविषयक आंकडे जमविण्यास मदत

अमेरिकेमधील फोर्ड फौंडेशन ह्या संस्थेनें भारत सरकारच्या गृहखात्याला ९ लाख, ५४ हजार, ८०० डॉलर्स अथवा ४५·३५ लाख रुपयांची रक्कम मदतीदाखल दिली आहे. जन्म—मृत्युविषयींचे आंकडे जमविण्याच्या व त्यांची संगति लावण्याच्या पद्धतींत सुधारणा करण्यासाठी ह्या रकमेचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. लोकसंख्याविषयक आंकडे जमविण्याच्या पद्धतीचें शिक्षण देण्यासाठी एक संशोधन केंद्र मध्यवर्ती सरकार स्थापन करणार आहे.

### कामगार बोनस कसा खर्च करतात ?

दक्षिण भारतीय कापड-संशोधन-केंद्रानें कामगारांना मिळणाऱ्या बोनसची रक्कम ते कशी खर्च करतात ह्या संबंधी पाहणी केली आहे. पाहणीसाठी कोईमतूरच्या आसमंतांतील कामगारांची निवड करण्यांत आली होती. पाहणींत असें आढळून आलें कीं, बहुतेक कामगार बोनसच्या रूपानें मिळालेला जादा पैसा नवे कापड घेण्यांत, कर्ज निवारण्यांत, धार्मिक स्वरूपाचीं कृत्यें करण्यांत आणि सामाजिक दृष्टीनें आवश्यक असलेला खर्च करण्यांत मुख्यतः वापरतात.

### नोटांच्या साठेबाजीवर उपाय

ब्रह्मदेशाच्या क्रांतिकारी सरकारनें १०० व ५० क्याटसूच्या चलनी नोटा रद्द केल्या आहेत. ब्रह्मदेशांतील श्रीमंत आसामींनीं ह्या नोटांची साठेबाजी करून किमती खाली आणण्याच्या सरकारच्या धोरणांत व्यत्यय आणला, असें सरकारचें मत आहे. नोटांची साठेबाजी करणारांत परदेशी नागरिकांप्रमाणेंच ब्रह्मी नागरिकहि सामील आहेत. ब्रह्मदेशामधील व्यवहारांत आता वरील रकमांच्या नोटा बेकायदेशीर ठरविण्यांत आल्या असल्यानें त्या रद्द झाल्याच्या हुकुमापासून ७ दिवसांच्या आंत सरकारकडे परत करावयाच्या आहेत. चलनी नोटा परत न करणाऱ्या गुन्हेगारांस कमींत कमी १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा देण्यांत येणार आहे. ब्रह्मदेशाचा १ क्याट म्हणजे भारताचा १ रुपया आहे. ब्रह्मदेशांतील बँकांचें राष्ट्रीयीकरण झाल्यावर भांडवलदारांनीं आपला पैसा काढून घेऊन तो व्यापारांतील/तेजीमंदीसाठी वापरला, असा सरकारचा आरोप आहे.

### पूर्व पाकिस्तानांतून आलेले स्थलांतरित

पूर्व पाकिस्तानांतील अशांत परिस्थितीनें भयभीत होऊन भारतांत आलेल्या स्थलांतरितांची संख्या आतां ४ लाखांपेक्षाहि अधिक झाली आहे. गेल्या महिन्याच्या दुसऱ्या अर्धात स्थलांतर करणाऱ्या लोकांची रोजची संख्या ३,८०० वरून ४,५०० पर्यंत वाढली. ह्या निर्वासितांची सोय लावून देण्यासाठी भारत सरकारनें राज्य सरकारांना आतांपर्यंत २·४३ कोटी रुपयांची रक्कम मदत आणि कर्जें ह्यांच्या रूपानें दिली आहे. निरनिराळ्या राज्यांत आतांपर्यंत निर्वासितांसाठी ६६ छावण्या उघडण्यांत आल्या आहेत.

### विजेची निर्मिती वाढविण्यासाठी मदत करा

म्हैसूर येथील एंजिनिअर्स असोसिएशन आणि इन्स्टिटयूशन ऑफ एंजिनिअर्स ह्या संस्थांचें एकीकरण करण्यांत आले आहे. त्या वेळीं झालेल्या सभारंभप्रसंगीं बोलतांना मध्यवर्ती सरकारचे पाणीपुरवठा आणि वीज मंत्री श्री. के. एल. राव म्हणाले कीं सध्यां भारतापुढें सर्वांत तांतडीचा कोणता प्रश्न असेल तर तो औद्योगिक शक्तीच्या पुरवठ्याचा. औद्योगीकरण साधण्यासाठी विजेची निर्मिती मूलभूत आहे, म्हणून तिकडे लक्ष देणें निकडीचें आहे. देशांतील औद्योगिक शक्तीचा पुरवठा वाढविण्याच्या कामीं राज्यसरकारें आणि मध्यवर्ती सरकार ह्यांच्या विद्युत्पादनाच्या योजनेंत एंजिनिअर्सनी शक्य तितकी मदत करावी. विद्युत्पादनाच्या योजनांना अंमलात आणण्यांत दिरंगाई कां व कशी होत आहे ह्याचा त्यांनीं अभ्यास करावा आणि कामाचा उरक पाडण्यासाठी सूचना कराव्या. विद्युत–निर्मिती-केंद्राची रचना, त्यांची बांधणी आणि विजेच्या पुरवठ्याची व्यवस्था ह्या बाबतींताहि त्यांना सूचना करता येण्यासारख्या आहेत. सध्या देशांत वीज पुरवठा करणाऱ्या अनेक संघटना आहेत. त्यांच्या पैकी छोट्या वीजवितरकांची ह्या धंद्यांतून निवृत्ती केली पाहिजे. उत्तर प्रदेश हें भारतामधील सर्वांत मोठें राज्य आहे, परंतु इतर राज्यांच्या मानानें विजेच्या उत्पादनाच्या बाबतींत तें बरेच मागासलेलें आहे. गंगा नदीच्या खोऱ्यांत पाण्याच्या प्रवाहाच्या साहाय्यानें वीज उत्पन्न करण्यास अजूनहि वाव आहे. त्या दृष्टीनें गंगेच्या खोऱ्यांतील नद्यांची पाहणी करण्यास लवकरच सुरवात होणार आहे. ह्या पाहणींत वीज उत्पन्न करण्यासाठी योग्य अशा ठिकाणांचा शोध घेण्यांत येईल.


## दि सरदार कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

कारबोनिक ॲसिड गॅस

सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी

आणि

खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्‌चें ऑफिस

सर विठ्ठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फिझाइट फॅक्टरी टे. ६११११९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. १०८
३ दिल्ली–रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता–१०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७–२२४७
५ विजयवाडा–गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी–डलहौसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '

### दोनशें वर्षांपूर्वीचें धान्याचें कोठार

पाटणा शहराजवळ एक प्रचंड धान्यांचें कोठार असून तें १७२४ सालीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमाने बांधण्यांत आले आहे. ह्या प्रचंड कोठाराचें काम एका ब्रिटिश एंजिनीअरनें केलेलें आहे. बांधकाम १७२६ सालीं पूर्ण करण्यांत आले. तेव्हांपासून २३८ वर्षें त्यांत धान्य सांठवण्यांत येत आहे. कोठाराची बांधणी गोलाकार असून त्याच्या शिखरावर जाण्यासाठी पायऱ्याहि बांधलेल्या आहेत. शिखरावरून पाटणा शहराच्या आसमंतांतील देखावा फारच चांगला दिसतो. पाटण्याच्या परिसरांत वारंवार पडणाऱ्या दुष्काळाला तोंड देण्यासाठी कोठार बांधण्यांत आले, अशा अर्थाचा एक शिलालेख त्याच्या भिंतीत बसविण्यांत आलेला आहे.

श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०

२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००

## Fergusson College, Poona 4.

The College will reopen on the 26th June, 1964. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examination are declared.

Poona
May 27, 1964. Principal

महाराष्ट्रांतील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

**डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स**

संस्थापक : प्रा. ग. कृ. भोपटकर, एफ्. सी. आय.
स्थापना : १९१८ ] [ टेलिफोन नं. २२३६०

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणें १.

जी. सी. डी., डी. कॉम., एल. सी. सी., जी. डी. सी. ॲन्ड ए. सी. ए. आय. आय. बी., ए. आय. सी. डब्ल्यू. ए., ( कॉस्टिंग ), भारत सरकारच्या कंपनीच्या सेक्रेटरी परीक्षा, लायसेन्शिएट इन्शुअरन्स परीक्षा, शार्टहँड, इंग्रजी-मराठी टाईपरायटिंग, पुणें विद्यापीठाच्या एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स व बी. कॉम. डिग्री कोर्स आणि इन्स्टिट्यूटचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

२९ जून, १९६४ पासून वर्ग सुरू होतील

— खास वैशिष्टें —

★ सकाळ-संध्याकाळचे वर्ग.
★ इंग्रजी-मराठींतून अध्यापनाची सोय.
★ जी. सी. डी., व जी. डी. सी. अँड ए., कोर्सेससाठी वार्षिक रु. १२०० च्या आंत उत्पन्न असलेल्या गरीब विद्यार्थ्यांसाठीं सरकारी फ्रीशिप्स.
★ एस्. एस्. सी., अंडर-ग्रॅज्युएटस् व ग्रॅज्युएटस् अशा सर्वांना योग्य असे अभ्यासक्रम.
★ बँकेंत नोकरी करणाऱ्या वा नोकरी करूं इच्छिणाऱ्यासाठी ३ महिन्यांचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.
★ बी.कॉम.एक्स्टर्नल डिग्रीच्या अभ्यासाची संपूर्ण सोय.

श्री. वा. काळे ह्यांचीं

कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें

१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?




बेडेकर
मसाले, लोणचीं
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.
वापरून पाहा.
कुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर,
कोट व परळ.

**PENSION COLLECTION? NO PROBLEM...**

Since grandfather opened his account with the Bank of Maharashtra getting his pension is no problem. It is like any other banking operation. Contact any Agent of the Bank of Maharashtra who will be happy to give you all information.

**THE BANK OF MAHARASHTRA LTD.**

Thorle Bajirao Road, Poona-2.



### भारतांतील विदेशी कंपन्या : राज्यवार वांटणी

( ३१ मार्च, १९६३ )

| राज्य | कंपन्यांची संख्या |
| --- | --- |
| प. बंगाल | २८७ |
| महाराष्ट्र | १८३ |
| मद्रास | २८ |
| दिल्ली | २८ |
| आसाम | २७ |
| केरळ | १२ |
| म्हैसूर | ४ |
| आंध्रप्रदेश | ४ |
| पंजाब, ओरिसा ( प्रत्येकीं ) | २ |
| बिहार, उ. प्रदेश, मध्यप्रदेश, त्रिपुरा (प्रत्येकीं) | १ |
| एकूण | ५८० |

### भारतांतील विदेशी कंपन्यांची मूळ देशशार वांटणी

| मूळ देश | कंपन्यांची संख्या |
| --- | --- |
| ग्रेट ब्रिटन | ३९० |
| अमेरिका | ७२ |
| पाकिस्तान | १३ |
| प. जर्मनी, फ्रान्स, ( प्रत्येकीं ) | १२ |
| जपान | ११ |
| इटली, स्वित्झरलंड, ( प्रत्येकीं ) | ८ |
| कॅनडा | ७ |
| स्वीडन, नेदरलंड्स, ऑस्ट्रेलिया, ( प्रत्येकीं ) | ६ |
| हाँगकाँग, पनामा, बहामा, सिलोन, ( प्रत्येकीं ) | ३ |
| युगोस्लाव्हिया, ब्रि. पू. आफ्रिका, बर्मा, ( प्रत्येकीं ) | २ |
| बेल्जम, हॉलंड, सिंगापूर, फिलिपाइन्स, लॅबेनॉन, चीन, ( प्रत्येकीं ) | १ |
| एकूण २६ देश | एकूण ५८० कंपन्या |

### नगर जिल्ह्यांतील पाण्याचा दुष्काळ

उत्तर नगर जिल्ह्यांत पाण्याचा दुष्काळ पडल्यामुळें उसाची उभीं पिकें वाळून चाललीं आहेत. गेल्या ५० वर्षांत पाण्याची इतकी टंचाई अनुभवास आलेली नाहीं. उसाच्या पिकाला धोका पोचल्यामुळें ह्या भागांतील सहकारी साखर कारखान्यांचें २ कोटी रुपयांचें नुकसान होण्याचा संभव निर्माण झाला आहे. श्रीरामपूर, कोपरगांव आणि राहुरी तालुक्यांतील सहकारी साखर कारखान्यांना पुढील वर्षी नेहमीं मिळणाऱ्या उसाच्या पुरवठ्याच्या ५० ते ६० टक्के ऊस गळितासाठी मिळूं शकेल. प्रवरा, मुळा आणि गोदावरी ह्या नद्यांचीं पात्रें शुष्क झालीं असून कालव्यावर पोसल्या जाणाऱ्या उसालाही पुरेसें पाणी मिळत नाहीं. ह्या भागांतील पुष्कळशी उसाची बागायत विहिरीच्या पाण्यावर अवलंबून असते. पण बहुतेक विहिरीही कोरड्या झाल्या आहेत.

### दि ओगले ग्लास वर्क्स लि.

दि ओगले ग्लास वर्क्स लि. ला १९६३ सालीं ४·६२ लक्ष रु. निव्वळ नफा झाला. १९६२ सालीं तो ४·३३ लक्ष. रु. होता. १९६२ सालीं ८८·८१ लक्ष रु. ची विक्री झाली होती, ती १९६३ सालीं १·०३ कोटी रु. ची झाली.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

**: मुख्य कचेरी :**
९, बँक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४

**: विभागीय कचेरी :**
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

**: बृहन्मुंबईतील शाखा :**

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगांव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर (१०) माहीम ( ११ ) शीव

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
| --- | --- | --- |
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ७५ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४१ लाख |
| ठेवी | ... | २९ कोटी ६३ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६७ कोटी ८७ लाख |

**महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

संरक्षण निधीच्या रकमा या बँकेंत स्वीकारल्या जातात.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः—युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

सेव्हिंग्ज् बँक:–२ टक्के

**मुदत ठेवी**

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षे–४½ टक्के, ३ वर्षे–४¾ टक्के, ४ वर्षे–५ टक्के, ५ वर्षे–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा–विस्तार**

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई–दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१–१२–१९६३

| | | |
| --- | --- | --- |
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.

### चीन मुद्दामच तंटे उपस्थित करतो

बिहार राज्य भारत-रशिआ सांस्कृतिक संघटनेतर्फे पाटणा येथें रशिआंतील पुस्तकांचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना कलकत्ता येथील रशिअन कॉन्सल-जनरल मि. व्हॉइनाव्ह म्हणाले कीं १९६२ सालीं क्यूबाच्या प्रश्नावर अमरिका आणि रशिआ ह्यांच्यांत कमालीचें तंग वातावरण निर्माण झालें असतांना चीननें भारताच्या सरहद्दीवर आक्रमण केलें ही वस्तुस्थिति आहे. चीन आणि हिंदुस्थान ह्यांच्यामधील सरहद्दीबद्दल उभयता देशांत हजारों शतकें कोणताहि वाद उत्पन्न झालेला नव्हता. तथापि वाद उत्पन्न झाल्यावर तो वाटाघाटींनींच मिटवावा असा सल्ला रशिआनें वारंवार दिलेला होता. चीनचे पुढारी आपल्या शेजारी देशांशीं सरहद्दींबाबत मुद्दामच तंटे उपस्थित करीत आहेत.

---

### बोकारो येथील पोलादाचा कारखाना

बोकारो येथें उभारण्यांत यावयाच्या पोलादाच्या ४ थ्या कारखान्याच्या जागेची पाहणी करण्यासाठी रशिअन तंत्रज्ञांची एक तुकडी जूनच्या तिसऱ्या आठवड्यांत भारतांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी करावयाची प्राथमिक तयारी झपाट्यानें उरकण्यांत येणार आहे. ह्यासंबंधी रशिअन आणि हिंदी तंत्रज्ञांचीं बोलणींहि झालेलीं आहेत. कारखान्यासंबंधी दस्तुर आणि कंपनीनें तयार केलेला तपशीलवार अहवाल रशिआला पाठविण्यांत आला आहे. अहवालाचा अभ्यास करण्याचें काम रशिअन तंत्रज्ञ सध्यां करीत आहेत. उभारणीच्या कामासंबंधीचे निर्णय ते भारतांत आल्यावर घेण्यांत येतील. हा कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत उभारला जाणार आहे.

---

### ग्रामीण भागासाठीं पाण्याचा पुरवठा

ग्रामीण भागांतील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याचें काम राज्य सरकारांनीं येत्या ६ महिन्यांत पुरें करावें अशी सूचना भारताच्या नियोजन समितीनें केली आहे. स्थानिक स्वरूपाच्या विकासाचीं कामें पार पाडण्यासाठी नियोजन समितीनें राज्य सरकारांना ३·५ कोटी रुपयांची मदत देण्याचें ठरविलें आहे. ही रक्कम १९६४–६५ सालासाठी आहे. खेड्यांतील रस्ते, विहिरी, इत्यादि प्रकारचीं कामें करण्यासाठी या रकमेचा वापर मुख्यत: करण्यांत यावयाचा आहे. नळानें पाणीपुरवठा करण्यासारख्या ज्या कामांना एंजिनिअरिंगचें ज्ञान आवश्यक असेल अशा कामासाठी १ कोटी रुपयांच्या वेगळ्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. ही कामें मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य खात्यातर्फे करण्यांत येतील.

### पाकिस्तानची लोकसंख्या

पाकिस्तानची लोकसंख्या ९·३८ कोटी झाली आहे. लोकसंख्येच्या दृष्टीनें पाकिस्तानचा जगांत सहावा अनुक्रम लागतो : चीन, भारत, रशिआ, अमेरिका, इंडोनेशिया आणि पाकिस्तान असा अनुक्रम आहे. १९५१ चे मानानें १९६१ सालीं लोकसंख्या २३·९४% वाढली आहे. एकूण लोकसंख्येपैकी ५४% पूर्व पाकिस्तानांत आहे.

#### ५५% लोकांची मातृभाषा बंगाली

भाषेच्या दृष्टीने विचार करतां, पाकिस्तानांतील ५५·५% लोकांची मातृभाषा बंगाली आहे. त्या खालोखाल पंजाबी मातृभाषेचे (२९%) लोक आहेत. फक्त ३·७% लोकांची मातृभाषा उर्दू आहे.

पाकिस्तानांतील १९·२% लोक साक्षर आहेत. साक्षरांपैकी ५·१% मॅट्रिक पास आहेत.

५८% लोक मुसलमान आहेत, तर ११% लोक हिंदु आहेत.

---

### बद्रीनाथ मंदिराच्या पुजाऱ्याचें उत्पन्न

हिमालयांतील बद्रीनाथ मंदिराच्या पुजाऱ्याचे मासिक उत्पन्न १ हजार रुपये आहे. देवळाच्या चालकांकडून त्याला दरमहा ३०० रुपये पगार देण्यांत येतो. त्याशिवाय यात्रेकरूंकडून होणाऱ्या दानधर्मामध्येंहि त्याचा वांटा असतो. पूर्वापार चालत असलेल्या संकेताप्रमाणें मंदिराच्या पुजाऱ्याची जागा केरळमधील नंबुद्रि ब्राह्मणाकडेच ठेवावयाची असते. अलीकडील कांहीं वर्षांत मंदिराला येणाऱ्या यात्रेकरूंची संख्या रोडावत चालली आहे. १९६१ मध्यें ९७ हजार यात्रेकरू आले होते. त्यांची संख्या १९६२ मध्यें ५९ हजारपर्यंत उतरली आणि गेल्या वर्षीं तर ३७ हजार यात्रेकरूच दर्शनासाठी आले.

---


**D. E. Society's**

**Brihan Maharashtra College of Commerce,**

**POONA 4.**

The College will reopen on 20th June 1964, for the academic year 1964–65. Students seeking admission to Pre-Degree, F. Y., S. Y., and T. Y. B. Com. Classes should apply early. Forms of admission and copies of the Prospectus are available in the College Office between 11 a. m. and 2 p. m. on all working days.

B. A. students wishing to study for the B. Com. degree should apply immediately after the result is declared.

PRINCIPAL.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.